आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३० ऑक्टोबर २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाचा सोहळा देशभरात साजरा होणार/ केवडिया इथल्या संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथाचा सहभाग

- जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारतानं पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्र्यांचं प्रतिपादन

- मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग आरक्षणाची सोडत येत्या ११ नोव्हेंबर रोजी

**आणि**

- महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा ऑस्ट्रेलियाशी सामना / नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा ऑस्ट्रेलियाचा निर्णय

**<><><><><>**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. ऐकूया याविषयी अधिक माहिती…

- - व्हीसी - -

*(भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची दीडशेवी जयंती उद्या आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थानांच्या विलीनीकरणाची प्रक्रीया कणखरपणे पूर्ण करणारे लोहपुरुष सरदार पटेल भारताच्या एकतेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. यंदा शतकोत्तर सुवर्णजयंतीचं औचित्य साधून देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. गुजरातमधे केवडिया इथं स्टॅच्यू ऑफ युनिटी या सरदार पटेल यांच्या स्मारकापाशी प्रजासत्ताक दिन संचलनाच्या धर्तीवर एकता संचलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन होणार आहे. या संचलनात विविध राज्यांची पोलिस दलं, घोडदळ, उंटदळ, इत्यादी सहभागी असतील. या संचलनात एकतेचा धागा या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ सहभागी होणार आहे. या महोत्सवात येत्या ७ आणि ८ नोव्हेंबरला सांस्कृतिक*

*कार्यक्रमातही महाराष्ट्राच्या लोकपरंपरा दाखवणारं १५ ते २० कलाकारांचं सादरीकरण असेल.*

*राज्यात ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या काळात भारत पर्वा निमित्त विविध उपक्रम होणार असून त्यात युवकांनी भाग घ्यावा असं आवाहन राज्यशासनानं केलं आहे. यात पदयात्रा, निबंध वादविवाद स्पर्धा, चर्चासत्र, पथनाट्य अशा विविध आविष्कारातून सरदार पटेल यांच्या जीवनकार्याची ओळख करुन दिली जाईल आणि या लोहपुरुषाला अभिवादन करण्यात येईल.)*

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पाटणा इथं पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. येत्या १ नोव्हेंबर पासून १५ नोव्हेंबर पर्यंत भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती दिनी म्हणजेच जनजातीय गौरव दिनापर्यंत भारत पर्व साजरं केलं जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. या भेटीदरम्यान, ते आज केवडिया येथील एकता नगरमध्ये एक हजार १४० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील आणि ई-बसना हिरवा झेंडा दाखवतील. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दीडशे रुपयांच्या विशेष नाण्याचं आणि टपाल तिकीटाचं प्रकाशनही करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारताने पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. ते आज मुंबईत भारत नौवहन सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. वास्को द गामा भारतात पोहोचण्यापूर्वी अनेक वर्षांपासून भारतीय व्यापारी समुद्रमार्गे जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले होते असं ते म्हणाले. अमृतकाळात नौवहन क्षेत्रातल्या भारतीय पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करुन घेतला पाहिजे असं आवाहन त्यांनी केलं.

- **- होल्ड - मांडवीय - बाईट -**

भारतीय नौवहन क्षेत्रातल्या अग्रणी महिला कॅप्टन जे सी आनंद यांचा मांडवीय यांनी सत्कार केला.

**<><><><><>**

शेतकऱ्यांनी केवळ शेती न करता उत्पादक बनावं असं आवाहन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केलं आहे. एफ पी ओ म्हणजे कृषी उत्पादक संघटनांच्या नवी दिल्लीत आयोजित संमेलनात आज ते बोलत होते. आतापर्यंत कृषी उत्पादक संघटनामधे ५२ लाख शेतकरी सदस्य आहेत, आता एका वर्षात २ कोटी शेतकरी सदस्य व्हावेत असं उद्दिष्ट ठेवलं पाहिजे असं ते म्हणाले.

**-- होल्ड- बाईट- कृषीमंत्री - -**

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांची तयारी वेगात सुरू झाली असून राज्य निवडणूक आयोगानं आरक्षण निश्चिती आणि सोडत कार्यक्रमाचं सविस्तर वेळापत्रक जाहीर केलं. त्यानुसार, निवडणुकीसाठी ११ नोव्हेंबर रोजी आरक्षण सोडत काढली जाईल. १४ नोव्हेंबर रोजी आरक्षणाचं प्रारूप जाहीर झाल्यावर नागरिकांना आपल्या हरकती-सूचना नोंदविण्याची संधी मिळेल. २० नोव्हेंबरपर्यंत या हरकती स्वीकारल्या जातील. त्यानंतर सर्व हरकतींचा विचार करून पालिका आयुक्त अंतिम निर्णय घेतील आणि आयोगाची मान्यता घेऊन अंतिम आरक्षण २८ नोव्हेंबर रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध होईल.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ही संपूर्ण प्रक्रिया निश्चित वेळापत्रकानुसार पूर्ण करणं बंधनकारक आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका जानेवारी २०२६ पूर्वी घेण्यात येतील, हे आता स्पष्ट झालं आहे.

**<><><><><>**

निवडणूकीसंदर्भात नागरिकांच्या शंका आणि तक्रारींचं निराकरण करण्यासाठी निवडणूक आयोगानं राष्ट्रीय तसंच राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय हेल्पलाइन सक्रिय केल्या आहेत. राष्ट्रीय संपर्क केंद्र सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्रीय हेल्पलाइन म्हणून काम करेल. ते दररोज सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत १८००-११-१९५० या टोल-फ्री क्रमांकाद्वारे कार्यरत राहणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

**<><><><><>**

देशभरातल्या १८ प्रकारच्या वजनं आणि मापन उपकरणांच्या तपासणीची प्रक्रिया पारदर्शक, अचूक आणि सोपी करण्यासाठी केंद्र सरकारने मेट्रोलॉजी नियम २०१३मध्ये सुधारणा केल्या आहेत. त्यामुळे जलमापक, उर्जामापक, वायूमापक, आर्द्रता मापक, वेगमापक आणि उष्णतामापकासारख्या उपकरणांची तपासणी सरकारमान्य परीक्षण केंद्रामधेच होणार आहे.

<><><><><>

मोंथा चक्रीवादळाचा जोर आता कमी झाला असला तरी त्याच्या प्रभावामुळा देशाच्या विविध भागात पाऊस पडत आहे. आंध्रप्रदेश, ओदिशा आणि पश्चिम बंगालच्या काही भागाला याचा फटका बसला आहे.

राज्याच्या सोलापूर, पुणे, चंद्रपूर, नागपूर, वाशीम आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस होत आहे.

<><><><><>

नंदुरबार मध्ये आज पावसानं सलग चौथ्या दिवशी हजेरी लावली आहे. पालघर जिल्ह्यात सकाळपासून पावसाचं वातावरण कायम असून अधून मधून पावसाची रिपरिप सुरू आहे. रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पाऊस सुरू असून, काल रात्री पावसानं अक्षरशः थैमान घातलं.

<><><><><>

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामना होत आहे. नवी मुंबईत डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर होत असलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाने या आठवड्यात १३ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे अमली पदार्थ आणि आणि इतर वस्तू जप्त केल्या. वेगवेगळ्या वेळी केलेल्या कारवाईत अधिकाऱ्यांनी बँकॉक हून आलेल्या प्रवाशांकडून १२ किलो ४१८ ग्रॅम वजनाचे अमली पदार्थ जप्त केले.

//<><><><><>//